# जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

वेब साईट : www.nanded. gov.in    ई-मेल dygennanded @_gmail.com
दूरध्वनी . : 02462-240303/248418    फॅक्स . :02462-240303/238500
शाखा : जि.प.पं.स.निवडणूक



दिनांकः-3-1-2012

## प्रेस नोट

मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांनी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक 2012 चा निवडणूक कार्यक्रम जाहिर केला असल्यामूळे आचार संहितेचे पालन करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

नांदेड जिल्हा परिषद व त्या अधिनस्त पंचायत समित्यांच्या निवडणूकीसाठी दिनांक 7 फेब्रुवारी 2012 रोजी मतदान होणार असून,त्याची मतमोजणी दिनांक 8 फेब्रुवारी 2012 रोजी होणार आहे. निवडणूकांचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहणार आहे. निवडणूक क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव पडेल,अशा त-हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे झाल्यास त्याबाबत मा.राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेणे आवश्यक आहे. आचार संहितेमधील तरतूदींचे सर्वतोपरी पालन होईल याची दक्षता सर्वांनी घेण्याची सूचना आयोगाने केली आहे.

उमेदवारांसाठी,जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी, निवडणूक खर्चाची मर्यादा तीन लाख रुपये तर पंचायत समिती निर्वाचक गणासाठी ती दोन लाख रुपये एवढी आहे.

आरक्षित जागांवर निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जातीचे प्रमाणपत्राची प्रत व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक असून,छाननीच्या वेळी मुळ जात प्रमाणपत्र व जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र देणे व स्विकारण्याची मुदत 18 जानेवारी ते 23 जानेवारी सकाळी 11.00 ते दु.3.00 पर्यंत,नामनिर्देशनपत्राची छाननी दिनांक 24 जानेवारी रोजी,वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे दिनांक 24 जानेवारी, नामनिर्देशनपत्र मागे घेणे दिनांक 30 जानेवारी, निवडणूक चिन्ह वाटप दिनांक 30 जानेवारी 2012 हा आहे.

प्रचार साहित्याच्या छपाई बाबत व प्रचार सीडीचे केबलवरुन प्रसारणाबाबत आचार संहितेचे काटेकोरपणे पालन होणे अनिवार्य आहे.

जिल्हा परिषद/पंचायत समित्यांच्या निवडणूका शांततेत व सुव्यवस्थित पणे पार पाडण्यासाठी आचार संहितेचे काटेकोरपणे पालन करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

3.1.2012

जिल्हाधिकारी नांदेड,करिता.